# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत नागपूर
**{ समाज विकास विभाग }** शहरातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, महिलांच्या कला-कौशल्याला वाव मिळावा व उद्योग करण्यास प्रेरणा मिळावी या उद्देशाने, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजनाकरिता येणारा अपेक्षित खर्च पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अनु. क्र. | विवरण | अपेक्षित खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता स्थापत्य कामाचे प्राकलन कार्यकारी अभियंता. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. २४,९३,५४८/- | संबंधित कार्य/ई-निविदा समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| २ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता विद्युत कामाचे प्राकलन कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी दिलेले आहे. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. ३१,७९,४८८/- | संबंधित कार्य/ई-निविदा विद्युत विभाग, मुख्य कार्यालय स्तरावर करण्यात येईल. |
| ३ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता इव्हेंट कामाचे प्राकलन. (जास्तीत जास्त नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे याकरिता मनोरंजनात्मक कार्यक्रमाकरिता स्थानीय, राज्य पातळी व राष्ट्रीय पातळीवर कलाकारांना आमंत्रित करणे.) तसेच प्रमाणपत्र. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. ३०,२२,३१४/- | संबंधित कार्य/ई-निविदा समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| ४ | मैदान भाडे व वेळेवर लागणारे आकस्मिक खर्च इत्यादी. | रू. ६,००,०००/- | अग्रीमाद्वारे (समाज विकास विभागा अंतर्गत) |
| ५ | महिला उद्योजिका मेळाव्याची वृत्तपत्रातून जाहिरात व प्रसिद्धी इत्यादी | रू. २,००,०००/- | समाज विकास विभागामार्फत माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे |
| ६ | होर्डींग्स, बॅनर, स्टँडी, फ्लेक्स बॅनर (झोनकरिता), डँगलर, माहितीपत्रक (कलर), ओळखपत्र (स्टॉल धारक, अधिकारी/कर्मचारी), | रू. ५,००,०००/- | समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| | एकूण | रू. ९९,९५,३५०/- | - |

उपरोक्त प्रमाणे एकूण खर्च रू. ९९,९५,३५०/- (अक्षरी – रूपये नव्यानऊ लक्ष पंच्यानऊ हजार तीनशे पन्नास फक्त) अपेक्षित असून याकरिता १००.०० लक्षाची तरतूद मनपा ठराव क्रमांक १३१/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक १८/०६/२०२५ अन्वये समाज विकास विभागा अंतर्गत माता बाल संगोपन व महिला कल्याण या पदा अंतर्गत केलेली आहे. स्थापत्य विभाग, विद्युत विभाग व क्रीडा विभागामार्फत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक मंजुरी (Technical Sanction) प्राप्त करून घेण्यात येईल.

सदर कार्यक्रमाकरिता ई-निविदा स्वतंत्ररित्या (स्थापत्य + इव्हेंट + विद्युत) संबंधित विभागाकडून घेऊन समाज विकास विभाग, मुख्य कार्यालय यांच्या स्तरावर काढण्यात येईल. ई-

निविदा प्रक्रिया व महिला उद्योजिका मेळाव्याशी संबंधित इतर अनुषंगिक बाबीचे निर्णय टेंडर समिती मार्फत घेण्यात येईल.

सबब महिला उद्योजिका मेळावा आयोजित करण्याकरिता अपेक्षित रू. ९९,९५,३५०/- (अक्षरी- रूपये नव्व्यान्नऊ लक्ष पंच्यान्नऊ हजार तीनशे पन्नास फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रश्न विचारात घेऊन, मंजुरी मिळण्याकरिता सादर प्रस्तुत.

**टिप** :- १) सदर खर्च म.न.पा. अर्थसंकल्पात सन २०२५-२०२६ अंदाजपत्रकातील पद क्र. A47002473803 मधून करण्यात येईल.

२) सविस्तर माहिती नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 360/स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 05/11/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (सविवि), समाज विकास विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार समाज विकास विभाग, महानगरपालिका, नागपूर मार्फत नागपूर शहरातील महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे, महिलांच्या कला-कौशल्याला वाव मिळावा व उद्योग करण्यास प्रेरणा मिळावी या उद्देशाने, सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजन करण्याचे प्रस्तावित आहे. महिला उद्योजिका मेळाव्याचे आयोजनाकरिता येणारा अपेक्षित खर्च पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अनु. क्र. | विवरण | अपेक्षित खर्च | शेरा |
|---|---|---|---|
| १ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता स्थापत्य कामाचे प्राकलन कार्यकारी अभियंता. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. २४,९३,५४८/- | संबंधित कार्य/ई-निविदा समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| २ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता विद्युत कामाचे प्राकलन कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग यांनी दिलेले आहे. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. ३१,७९,४८८/- | संबंधित कार्य/ई-निविदा विद्युत विभाग, मुख्य कार्यालय स्तरावर करण्यात येईल. |
| ३ | महिला मेळावा कार्यक्रमाकरिता इव्हेंट कामाचे प्राकलन. (जास्तीत जास्त नागरिकांनी कार्यक्रमाला उपस्थित राहावे याकरिता मनोरंजनात्मक कार्यक्रमाकरिता स्थानीय, राज्य पातळी व राष्ट्रीय पातळीवर कलाकारांना आमंत्रित करणे.) तसेच प्रमाणपत्र. (प्राकलनात नमूद केल्याप्रमाणे) | रू. ३०,२२,३१४/- | संबंधित कार्य/ई-निविदा समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| ४ | मैदान भाडे व वेळेवर लागणारे आकस्मिक खर्च इत्यादी. | रू. ६,००,०००/- | अग्रीमाद्वारे (समाज विकास विभागा अंतर्गत) |
| ५ | महिला उद्योजिका मेळाव्याची वृत्तपत्रातून जाहिरात व | रू. २,००,०००/- | समाज विकास विभागामार्फत |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्रसिद्धी इत्यादी | | माहिती व जनसंपर्क विभागाद्वारे |
| ६ | होर्डींग्स, बॅनर, स्टँडी, फ्लेक्स बॅनर (झोनकरिता), डँगलर, माहितीपत्रक (कलर), ओळखपत्र (स्टॉल धारक, अधिकारी/कर्मचारी), | रू. ५,००,०००/- | समाज विकास विभाग स्तरावर करण्यात येईल. |
| | एकूण | रू. ९९,९५,३५०/- | - |

उपरोक्त प्रमाणे एकूण खर्च रू. ९९,९५,३५०/- (अक्षरी – रूपये नव्यानऊ लक्ष पंच्यानऊ हजार तीनशे पन्नास फक्त) अपेक्षित असून याकरिता १००.०० लक्षाची तरतूद मनपा ठराव क्रमांक १३१/स्थायी समिती/प्रशासक, दिनांक १८/०६/२०२५ अन्वये समाज विकास विभागा अंतर्गत माता बाल संगोपन व महिला कल्याण या पदा अंतर्गत केलेली आहे. स्थापत्य विभाग, विद्युत विभाग व क्रीडा विभागामार्फत उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे तांत्रिक मंजुरी (Technical Sanction) प्राप्त करून घेण्यात येईल.

सदर कार्यक्रमाकरिता ई-निविदा स्वतंत्ररित्या (स्थापत्य + इव्हेंट + विद्युत) संबंधित विभागाकडून घेऊन समाज विकास विभाग, मुख्य कार्यालय यांच्या स्तरावर काढण्यात येईल. ई-निविदा प्रक्रिया व महिला उद्योजिका मेळाव्याशी संबंधित इतर अनुषंगिक बाबीचे निर्णय टेंडर समिती मार्फत घेण्यात येईल.

सबब महिला उद्योजिका मेळावा आयोजित करण्याकरिता अपेक्षित रू. ९९,९५,३५०/- (अक्षरी- रूपये नव्ह्यान्नऊ लक्ष पंच्यान्नऊ हजार तीनशे पन्नास फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.